**सं.फौ.ख. क्र.५३०/२०२२**
**भद्रेश्वर पतसंस्था वि. मंगेश**
**नि.क्र.१८ पुढे सुरु.**

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१ ची उलटतपासणी शपथेवर सुरु**
**आरोपीतर्फे विधिज्ञ श्रीमती बी. एम. कोरवार -**

मी फिर्यादी पतसंस्थेत कर्ज वसुली अधिकारी म्हणून सन १९९६ सालापासून कार्यरत आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१ वरील फिर्यादवर माझे नाव नमुद नाही तसेच त्यावर कोठेही माझी सही देखील नाही. मी प्रस्तुत प्रकरणात पडताळणी कामी साक्ष दिलेली नाही. आता मला नि.क्र.२३ वरील कायदेशीर नोटीस दाखविण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, त्यावरदेखील माझी कोठेही सही किंवा नाव नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यातील पान क्र. ३ वर बँकेत कथित धनादेश कोणत्या तारखेस वटण्याकरीता टाकला त्याचा उल्लेख नाही. त्यावरील सही करणा-या व्यक्तीने कोणत्या अधिकाराने व पदा अन्वये सदरील सही केली याबाबतचा उल्लेख अथवा शिक्का त्यावर नमुद नाही. आता मला नि.क्र.२१ वरील धनादेश दाखविण्यात आला. त्यावर दि.०८.०४.२०२२ अशी तारीख नमुद आहे. हे म्हणणे खरे नाही की, ती थोडीशी गिरवलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या धनादेशावरील फिर्यादी संस्थेचे नाव ठळक अक्षरात नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या तुलनेत त्या धनादेशातील अक्षरात व अंकात नमुद असलेली रक्कम काहीशी कमी ठळक आहे. हे म्हणणे खरे आहे की, धनादेशातील रक्कम, फिर्यादीचे नाव व इतर मजकुर यातील शाईमध्ये फरक दिसून येतो आहे. साक्षीदार सांगतो की, तो धनादेश आरोपीनेच दिलेला आहे. आता मला नि.क्र.२५ वरील पोहोचपावती दाखविण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, त्यावर आरोपीची सही नाही. साक्षीदार सांगतो की ती आरोपीच्या पत्नीची सही आहे.

**<u>प्रकरण पुढील उलटतपासाकरीता तहकुब.</u>**

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

(आर. एम. भेंडे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वाई

दिनांक :- ०२/०१/२०२६